'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
ISSN :2348-7143 (Online)
मराठी भाषा आणि साहित्य विशेषांक
Vol. 3 Issue. 3
July-Sept.- 2016

# दलित कविता - एक अभ्यास

**डॉ. समिता जाधव**
**र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई**
**जि. बीड मोबा.९७६३७४८८८३**
**ई-मेल - majhijaee@gmail.com**

***दलित कविता ही स्वतंत्र व्यक्तीमत्त्वाची आणि लक्षणीय आहे. नकार, वेदना, विद्रोह या त्रिसुत्रींचा अंगीकार करुन या कवितेचा प्रवास होत आहे. पदार्पणातच आपल्या अस्तित्वाची दखल घ्यायला लावणाऱ्या या कवितेने डॉ.आंबेडकर हेच आपले मुख्य प्रेरणास्थान मानून स्वतंत्र वाटचाल केली आणि आपली स्वतंत्र ओळखही निर्माण केली. तोचतोचपणा, आक्रस्ताळेपणा, एकसुरीपणा, साचेबंदपणा, नकारात्मकता असे आरोपही तिच्यावर केले गेले. पण काळाबरोबर प्रवाहीत होऊन आणि काही वैशिष्ट्येपूर्ण प्रयोगांनी तिने आपले अस्तित्व आणि महत्त्व सिध्द केले. दलित कविता जेवढी सशक्त आणि वैशिष्ट्येपूर्ण आहे तेवढे इतर दलित साहित्यप्रकार नाही. त्यामुळे कविता हीच या साहित्याची खरी ओळख ठरली. मराठी कवितेला समृध्द करुन या कवितेने तिच्या सर्वांगीण कक्षा रुंदावणाल्या, तिचे अनुभवविश्व व्यापक केले. दलित कवितेने मराठी कवितेला दिलेले हे योगदान महत्वपूर्ण आहे.***

**प्रास्ताविक :-**

साहित्याचा पहिला हुंकार पद्यात होता असे इतिहास सांगतो. पद्य साहित्याला पूर्ण आकार देते. कवितेच्या माध्यमातून अनुभूतीचा प्रत्यय अधिक उत्कटतेने येतो. भावनेचा उत्कट उद्‌गार म्हणजे कविता असे म्हटले जाते. सर्वच भाषिक साहित्यात कविता हा वाङ्मय प्रकार अधिक प्रमाणात लिहिला गेलेला आढळतो. आणि विशेष म्हणजे तो प्रभावीही ठरला आहे. अनेकार्थता, सुचकता,अल्पाक्षरत्व,उत्स्फुर्तता अशा काही अंगभूत वैशिष्ट्यांमुळे प्रतिभावंत, संवेदनशील मनाला तिने नेहमीच भुरळ पडली आहे. आत्यंतिक अस्वस्थ भावना शब्दरुपात प्रकट करतांना कविता हाच वाङ्मयप्रकार अधिक जवळचा आणि सोयीचा वाटण्याचे प्रमाण अधिक आहे. मानवी जीवनात व्यक्तीगत आणि सामाजिक पातळीवरील विविध समस्या, गुंतागुंत, सूक्ष्मतम भावना यांचे प्रभावी प्रकटीकरण कवितेतून झालेले दिसते.

मराठी साहित्यात १९६० नंतरच्या काळात आपला विशेष प्रभाव निर्माण केलेल्या दलित साहित्यातही इतर वाङ्मयप्रकारांच्या तुलनेत कविताच अधिक संख्येने लिहिली गेली. तिचे स्वरुपही वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामुळे कविता हीच दलित साहित्याची खरी ओळख ठरते. कवितेनेच दलित साहित्याला एक निर्विवाद स्थान प्राप्त करुन दिले आहे. एवढेच नव्हे तर दलित कवितेने आपल्या समकालिन मराठी कवितेतही आपला स्वतंत्र प्रभाव निर्माण केला आहे. किंबहुना मराठी कवितेला जागतिक स्तरावर घेऊन जाण्यात दलित कवितेचे मोठे योगदान आहे. या प्रस्थापित समाजात आपण शेकडो वर्षापासून नाकारले जात आहोत ही सल जिव्हारी घेऊन जगणाऱ्या दलित समाजाच्या अस्तित्वाच्या, अस्मितेच्या, स्वाभिमानाच्या निकडीतून जन्माला आलेल्या दलित कवितेचे स्वरुप पुढील प्रमाणे सांगता येईल.-

**दलित मुक्ती लढ्याचे साधन -**

दलित कवितेचा जन्म हा दलित मुक्ती लढ्यातून झाला आणि याला महत्वाचे कारण म्हणजे दलित साहित्याचे मुख्य प्रेरणास्थान, डॉ.आंबेडकर यांनी आपल्या लेखनातून वैचारिक क्रांतीची बीजे पेरली. त्याचाच परिणाम म्हणून दलित साहित्याची निर्मीती समाजात क्रांती करण्यासाठीच झाली. डॉ.आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन अनेक दलित साहित्यिक लिहू लागले. त्यांनी आपली लेखणी हत्यारासारखीच वापरली. जेष्ठ साहित्यिक- समीक्षक भालचंद्र फडके म्हणतात,

"त्यांच्या (डॉ.आंबेडकरांच्या) मुक्तीलढ्याचा आणि दलित कवितेचा अतिशय जवळचा संबंध आहे. या मूक्तीलढ्यात जे बाबासाहेबांच्या नेतृत्त्वाखाली शिपाई म्हणून सामील झाले त्यांनी आपली कवित्वशक्ती लढा तीव्र व्हावा, अस्पृश्यांना जागे करावे म्हणून वेचली. त्यांच्या कवितेला साधन व्हावेच लागते." ('दलित साहित्य- वेदना आणि विद्रोह' डॉ.भालचंद्र फडके पृ.११३ ) म्हणजेच एकप्रकारे डॉ.आंबेडकरांनी दलित साहित्याला लढण्याची पर्यायाने हत्यार होण्याची प्रेरणा दिली. हे हत्यार या साहित्याने प्रस्थापित समाज व्यवस्थेविरुध्द चालविले. दलित साहित्याचा जन्म फक्त समाजचित्रण करण्यासाठीच नाही तर नवसमाज घडविण्यासाठीही झाला. त्यामुळे या साहित्याने स्वतःला दलित मुक्तीलढ्याचे साधन बनविले. चळवळ, लढा यांची पार्श्वभूमी असल्यामुळे या साहित्यात विद्रोह, संघर्ष, क्रांती यांचे संदर्भ वारंवार आणि सहजपणे येतात. कवी रविचंद्र हडसनकर क्रांतीची आरोळी ठोकतांना म्हणतात-

**"हाच तो माझा गळा आज,**
**आरोळी ठोकतो क्रांतीची**
**ज्याला अडकविले होते तुम्हीच गाडगे."**

**- 'विद्रोही कविता', संपा.केशव मेश्राम, पृ.५७**

नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, दया पवार, त्र्यंबक सपकाळे, किसन फागु बनसोडे, ज.वि.पवार, इत्यादी यांच्या कवितेत क्रांती आणि संघर्ष यांचे संदर्भ आढळून येतात. यावरुन हे लक्षात येते की, दलित कवींनी आपल्या कवितेचा वापर हत्यारासारखा देखील केला आहे. म्हणूनच मुक्तीलढ्याचे साधन म्हणून या कवितेकडे पाहता येते. दलित समाजाच्या उद्धरासाठी, माणूस म्हणून नाकारले गेलेले हक्क मिळविण्यासाठी दलित मुक्तीलढा निर्माण झाला. सर्व प्रकारच्या जाचातून दलितांना मुक्ती मिळावी यासाठी निर्माण झालेल्या लढ्यात दलित कवितेने साधन म्हणून योगदान दिले. त्यामुळे या कवितेचे स्थान दलित साहित्यात महत्वाचे ठरते.

**समुहमनाची अभिव्यक्ती -**

दलित कवी आपल्या कवितेतून जे दुःख मांडतात ते कुणा एकटयाचे नाही तर समस्त दलित समुहाचे आहे. समाजातल्या प्रस्थापित व्यवस्थेने या समाजाचे अस्तित्व शेकडो वर्ष नाकारले. त्यामुळे या समुहाचे दुःख मोठे आहे. हे दुःख व्यक्त करतांनाच दलित कविता समुहाला लढण्यासाठी, संघर्ष करण्यासाठी आवाहन करते. संघटीत होऊन संघर्ष करण्यासाची प्रेरणा डॉ.आंबेडकरांच्या विचारांतून मिळाली असल्याने ही कविता समुहाला उद्देशून समुहाच्याच भाषेत अधिक प्रमाणात बोलते. संघर्ष आणि त्याची प्रेरणा हा तिचा स्थायीभाव आहे. समूहाला आत्मभान देणारे आणि समुहाच्या अस्तित्वासाठीचे अनेक प्रश्न ही कविता व्यवस्थेसमोर मांडतांना दिसते. समुहाला जागे करुन व्यवस्थेला जाब विचारते त्यामुळे या कवितेत समुहमनाची अभिव्यक्ती वारंवार होते. पुर्वजांच्या वाट्याला जे जगणे आले त्यामुळे या समूहाच्या मनात एक न्यूनगंड निर्माण झालेला होता. तो दूर करुन स्वाभिमानाने जगण्याची आणि ती उर्मी इतरांमध्ये निर्माण करण्याची दलितांच्या नवजागृत मनाची अवस्थाही या कवितेतून व्यक्त झालेली दिसते. नव्या पिढीचे दलित कवी अरुण काळे म्हणतात-

**"आता आम्ही विकृत संदर्भ**
**धुडकावतो क्षणार्धात**
**आता आम्ही करतोय**
**न्यूनगंडाची वाताहत**
**आता पोपटांना बोलू देत नाही**

**आम्ही बात बात !**
**आता आम्ही उजेड पसरवतोय हातोहात !!!"**
**- रॉकगार्डन पृ.५८**

अनेक वर्षापासूनची वेदना, समाजाव्यवस्थेने - संस्कृतीने- परंपरेने लादलेले लाचारीचे जगणे या विरोधातील विद्रोह याची तीव्र प्रतिक्रिया दलित कवितेतून उमटतांना दिसते. त्यामुळेच प्रचंड तिरस्कार, उपरोध आणि संघर्षासाठी नेहमीच तत्पर असणारी प्रक्षुब्ध मने याचे प्रतिबिंब दलित कवितेत उमटलेले दिसते. प्रत्येक दलित अनुभवातूनही व्यक्त होते परंतु खऱ्या अर्थाने तो अनुभव 'आम्ही'चा असतो. साधारणपणे कवी जेव्हा कवितेतून आशय व्यक्त करतो तेव्हा तो त्याचा वैयक्तिक अनुभव असतो परंतु जेव्हा ती कविता रसिकांपर्यंत पोहोचते तेव्हा कवीचा तो अनुभव वैयक्तिक रहात नाही तो सामुहिक होतो. दलित कवितेचे हे वैशिष्ट्ये आहे की ही कविता समुहाचा अनुभव प्रामुख्याने व्यक्त करते. समुहात राहूनही वैयक्तिक अनुभव स्वतंत्र असू शकतात परंतु दलित समाजात जे अनुभव समुहाचे आहे तेच व्यक्तीचे आहे. त्यामुळेच रुढार्थाने कवितेत येणाऱ्या प्रेम, प्रेयसी, निसर्ग, चंद्र- तारे दलित कवितेत अपवादात्मक स्थितीतच आढळतात कारण त्यापेक्षा परंपरागत दु:खाचा सल मोठा आहे. वैयक्तिक अनुभवात आत्मामग्नता, आपल्या समाजापासून दुरवल्याची भावना व्यक्त होते. याबरोबरच प्रेयसीसाठी 'माणुसकी'च्या लढाईत सामील करुन घेऊन तिला भोवतालच्या विदारक वास्तवाची जाणीव करुन देणारा प्रियकर येतो. वैयक्तिक नातेसंबंधातील कविता 'मी'च्या पातळीवरुन व्यक्त होते. अर्थात अशा वैयक्तिक अनुभवाची कविता तुलनेने कमी म्हणूनच दलित कवितेची समुहाची कविता ही ओळख प्रामुख्याने येते.

**विविध भाषिक प्रयोग :**

दलित कविता ही भाषा व बोली यांच्या विविध प्रयोगांनी युक्त आहे. पारंपारिक बोलीभाषेतील अनेक संवाद म्हणी, वाक्प्रचार, स्वगत या कवितेत आढळतात. जेष्ठ दलित साहित्य समीक्षक रा.ग.जाधव म्हणतात, "स्वातंत्र्याच्या कुशीत जन्म घेतलेल्या दलित काव्याने जे स्वतंत्र व स्वत:चे शब्दब्रम्ह साक्षात्कारितेत त्या शब्द ब्रम्हाचे मुलभूत स्वरुप द्वंद्वात्मक आहे. विध्वंसक व विधायकता आणि मानवी दुरावा व जवळीक अशा दुहेरी द्वंद्वात्मकतेने ते शब्दब्रम्ह घडले आहे आणि दलित काव्याची सगळी रुपे मूलतः दुहेरी द्वंद्वाचीच अभिव्यक्ती ठरवतात." ('निळी पहाट' - रा.ग.जाधव पृ.५४) याचे प्रत्यंतर दलित कवितेतील विविध भाषिक प्रयोगावरुन येते. केशव मेश्राम 'आजीची गोष्ट' या कवितेत आजीचा संदेश आजीच्याच शब्दात सांगतात-

**"शिकवा खावाले शिळंबासं आंबीलकढी असेल तसं**
**घरात काही नसतच तं पेवावा पानी ताकंच जसं**
**उन्हले भेवावं कहाले? सुर्व्या तं आपल्याच गरम रक्ताचा मी जाईन मातीपरी तवां आणजो**
**कोरा कपडा तुया घामाचा, दुकानातून उक्ताचा**
**शेकजो नसा आतड्यावाणी... बापजाद्याची म्हणजो गाणी,**
**नको जाऊ देवाधरमात, तिरथ जत्रेच्या नस्त्या भरमात,रडावा नाही ...**
**धवावा नाही, आलास बाप्पा पैदा झालास**
**हाती धरुन सब्बल पक्की, आता चांदावाणी हास.."**
**- केशव मेश्राम, 'जुगलबंदी 'पृ.८**

प्रस्थापित समाजाकडून येणारे अनुभव कवितेत प्रत्ययकारी स्वरुपात येतात त्यामुळे काव्यभाषेला परिणामकारकता येते. 'माजले म्हार नाही करत जोहार', 'ये भडविच्या अरे प्रसाद बाटवला', 'अस्पृश्य ही का माणसे? कुत्र्यामांजरीची औलाद त्यांनी नुसती सेवा करावी,' 'अलीकडे तुम्हाला मस्ती आली धेडग्यांनो,' अशाप्रकारचे संवाद किंवा 'बामणाघरी लिवणं, कुणब्याघरी दाणं', 'दे दान सुटे गिऱ्हाण', 'रोजचं मढं त्याला कोण रडं,' तू ऐक नंदाच्या नारी sss हा हा sss यमुनेच्या तीरी गं sss हा हा sss 'धुणं बाई धुत व्हत्या गवळ्याच्या नारी गं.. गवळ्याच्या पोरी गं...' यासारख्या म्हणी - लोकगीतांचे संदर्भ कवितेत बघावयास मिळतात.

नामदेव ढसाळ यांच्या कवितेत सल्ली, गोटी, गुडसे, मायंदळ, सरसुंदा, भिर्डक, मुर्वत, कवंडळ, गावदला यासारखे महारी ग्रामीण बोलीतील शब्द येतात. पेपरवेट, वहयलन्सचं झाड, हॅरर, अंडरट्रायल, इव्हन यासारखे इंग्रजी, सब घोडे बारा टक्के, जहर, झूठ, दुष्मन, बर्बाद, आयी दिवाली, तू पतंगासग नाचे मै किसके संगे नाचू, हलचल यासारखे हिंदी तसेच तमाम, तनहाई, कबाब, खिमा, उडन खटोला, दरोबस्त, महजब्बी, काफिर, खतम, बैदा, राजरतन, किमाम यासारखे फारसी शब्द ही येतात. अरुण काळे यांच्या 'रॉकगार्डन' या संग्रहात शीर्षकापासूनच अनेक इंग्रजी शब्द सहजतेने आलेले दिसतात. उदा.स्लम एरिया, विलेक्शन, आर्शेंबली, बोन्साय जनरेशन गॅप, गार्ड ऑफ ऑनर, लिमिट इ.दी.

दलित कवितेच्या भाषेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या कवितेत येणारी 'सूर्य' ही प्रतिमा. मराठी कवितेत ही प्रतिमा सामान्य असली तरी दलित कवितेत हीच प्रतिमा विविध आशयांनी युक्त अशी येते. जवळजवळ प्रत्येक दलित कवी या प्रतिमेचा वापर करतो आणि महत्वाचे म्हणजे ही प्रतिमा डॉ.आंबेडकरांना उद्देशून आली आहे. 'प्रखर तेजाने तळपणारा सूर्य', 'हिरवा सुर्य', 'तांबडा सूर्य', 'इमानदार सूर्य," प्रलंयकारी सूय' अशा प्रतिमा डॉ.आंबेडकर आणि त्यांचे कार्य संदर्भात पुन्हा पुन्हा येतात.

दलित कवितेत अशा प्रकारे विविध भाषिक प्रयोग होतांना आढळतात. त्यामुळे ती कविता अधिक लक्षवेधक ठरली आहे.

**सामाजिक आणि कलात्मक जाणीवा** :

दलित कविता ही बांधिलकीची कविता आहे. तिची बांधिलकी आपल्या समूहाशी आहे. त्यामुळे या समाजाच्या उत्थानासाठी ती साधन म्हणून भुमिका पार पाडते. लढा द्यायचा अन्यायाला वाचा फोडायची, समाजाचे गाऱ्हाणे मांडायचे, दलित म्हणून अनुभव समाजात जगतांना आले त्याविरोधात विद्रोह करायचा अशा उद्देशानेच बहुतांश प्रमाणात ही कविता लिहीली गेली त्यामुळे या कवितेची साहित्यप्रकार किंवा कलनिर्मिती या अंगाने फारशी मांडणी झाली नाही. बहुतांश दलित कविता ही तोचतोचपणाच्या विशिष्ट चक्रात अडकलेली दिसते. सामाजिक जाणीवा या ठराविक आणि साचेबंद रुपात व्यक्त होतात. अशावेळी कवितेचे कवितापण शब्द होते की कय, अशी शंकाही येते मात्र काही दलित कवींची कविता याला अपवाद ठरते. दलित साहित्याचे समीक्षक प्रा.म.सु.पाटील म्हणतात, "ढसाळांची 'गोलपिठा' मधील रचना वास्तवदर्शन फार भेदकपणे घडवते. हे दर्शन घडवणे म्हणजे वास्तवाची प्रतिकृती रेखाटने नव्हे. काव्यात्म अनुभवात ते कल्पकतेच्या पातळीवरुन भावायचे असते व प्रतिमात्मक रुपात अविष्कृत करायचे असते. ही ताकद ढसाळ मनोहरांप्रमाणे इतर कवींत फारशी जाणवत नाही. (दलित कविता म.सु.पाटील, पृ.१०८) म.सु.पाटील यांनी म्हटल्याप्रमाणे ढसाळ- मनोहर यांचा अपवाद वगळता दलित कवितेत कलात्मक जाणीवा नाही. याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे 'मी' आणि 'आम्ही'चे अभिन्न नाते. मी हा आम्हीच्याच रुपात प्रकट होतो त्यामुळे मी च्या पातळीवर आलेला अनुभव प्रतिकात्मक रुपात व्यक्त होतांना त्यावर मर्यादा पडतात. दलित साहित्याने इथल्या व्यवस्थेला विरोध

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

करतांना परंपरेलाही विरोध केला. यामध्ये वाङ्मयीन परंपरेचाही समावेश होतो. साहजिकच अनुभव उत्कट असला तरी ठराविकच प्रतिमा- प्रतिकांचा वापर केल्यामुळे काव्यभाषेत ती उत्कटता साधत नाही. सुरुवातीच्या काळात लिहीली गेलेली कविता वाङ्मयीन हेतूने लिहीलीच गेली नाही. त्यामुळे तिच्यात वाङमयीन गुणदर्शन होणे अशक्यच होते. ढसाळ- मनोहर यांची कविता याला अपवाद ठरते. दुसऱ्या पिढीच्या कवींमध्ये मात्र ही जाणीव निर्माण झालेली दिसते. यादृष्टीने अरुण काळेंची कविता महत्वाची ठरते. कलात्मक जाणींवाच्या दृष्टीने ढसाळ- मनोहर यांची कविता महत्वाची ठरते. कारण त्यांनी स्वीकारलेली भुमिका आणि त्यांचे व्यक्तीमत्व दोन्ही गोष्टी त्यांच्या कवितेत प्रकट होतात. अंगभूत संवेदनशीलता, संपुर्ण व्यवस्थेकडे पाहण्याची स्वतंत्र दृष्टी आणि कविता या वाङप्रकाराची मुल्यात्मक जाणीव ही काही वैशिष्ट्ये त्यामागे दिसून येतात. नामदेव ढसाळांच्या 'पाणी', (गोलपीठा पृ.६२) 'माणसाने' (गोलपीठा पृ.३२), 'आईच्या समजुतीसाठी' (मुर्ख म्हाताऱ्यांने डोंगर हलविले पृ.२१) या व यासारख्या कविता यादृष्टीने महत्त्वाच्या ठरतात. ज्येष्ठ दलित समीक्षक प्रा.रा.ग.जाधव ढसाळांच्या पाणी या कवितेचे वर्णन सामाजिक जाणीवांचे सौदर्यपाणी असे करतात. दलित कवितेतन सामाजिक जाणीवा प्रकट होतातच फक्त त्या जाणीवांची उत्कटता कवितेतून व्यक्त करता आली तर कवितेत येते. अरुण काळे (रॉकगार्डन, सायरनचे शहर, नंतर आलेले लोक) प्रकाश कृष्णाजी पाटील (लेझीम खेळणारी पोरं) रविचंद्र हडसनसकर (सूर्यझेप आणि तळगर्भ) प्रज्ञा लोखंडे (मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा) हे कवी बांधीलकीची कविता लिहितानाच कलात्मक अंगानेही अनुभव प्रकट करतात त्यामुळे साचेबंद वाटणारी पहिल्या पिढीची कविता दुसऱ्या पिढीत प्रवाहित होऊन अधिक व्यापक होते.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर** :

एक मिथ् दलितांच्या समग्र जीवनाला कलाटणी देणारे त्यांना मुलभूत हक्कांची जाणीव करुन देणारे आणि संपूर्ण दूर्लक्षित समाजाला आपली स्वतंत्र ओळख मिळवून देणारे ऐतिहासिक काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. आंबेडकरांमुळे दलितांच्या आयुष्यातील अगतिकता संपली. त्यामुळे प्रत्येक दलित माणूस आंबेडकरांचा ऋणी आहे. आंबेडकरांबद्दलची कृतज्ञता दलित कवितेतूनही मोठ्या प्रमाणात व्यक्त होते. ही कविता आपले मुख्य प्रेरणास्थान म्हणून आंबेडकरांकडे पाहते. त्यामुळे प्रत्येक दलित कवी आंबेडकरांविषयीची कृतज्ञता व्यक्त करतो. त्यातून आंबेडकरांच्या व्यक्तीमत्त्वाला एक मिथ चे स्वरुप प्राप्त होते. स्वत: आंबेडकर हे विभूतीपूजक नव्हते त्यांचा या गोष्टीला विरोध होता. दलित कवींनी मात्र त्यांच्या व्यक्तीमत्त्वाची, कार्य-कर्तृत्वाची पूजा करुन त्यांना एका मिथ् जवळ नेऊन ठेवले आहे. ज्येष्ठ समीक्षक रा.ग.जाधव यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर ही दलित साहित्यातील एक मिथ कशी बनली आहे. आणि ती कशी योग्य आहे यासंदर्भात विवेचन केले आहे ते म्हणतात, डॉ.बाबासाहेबांचे स्थान दलित समाजाला एक अर्थगर्भ मिथ सारखे राखावे वाटल्यास नवल नाही. त्यांच्या अवतीभवतीच नवनव्या दलित जाणीवांचे तत्वांचे विचारांचे मोहोळ रचले जाणार आहे. त्यांची लौकिकताच अलौकिकाच्या प्रभेने दिप्त दूरस्थ होत जाणार आहे. मिथ, दंतकथा, बोधकथा, प्रतिककथा या व यासारख्या नानारुपांनी बाबासाहेबांचा इतिहास हा दैवतकथेत रुपांतरीत होत जाणार आहे. डॉ.आंबेडकर ही मिथ् कशी बनत चालली आहेत हे पहावयाचे असेल तर नामदेव ढसाळ, ज.वी.पवार इ. कितीतरी दलित कवींच्या डॉ.बाबासाहेबांवरील कविता वाचाव्यात असे मी सुचवीन, या कवितांमधून आपल्यासमोर घडलेला इतिहास प्रेरक पुराणकथा बनत चालल्याचे दिसून येते... निसर्गाच्या व मानवी जीवनाच्या सत्यांना मिथमध्ये जर कल्पनाप्रवण प्रेरकता लाभत असेल तर मिथच्या रुपाने ती सत्ये अंकित व आकलनीय होत असतील तर मिथची हीच निर्मितीप्रक्रिया दलित कवींनी लिहीलेल्या डॉ.बाबासाहेबांवरील कवितात धडत आहे असे म्हणता येईल." (रा.ग.जाधव, निळी पहाट पृ.५०) रा.ग.जाधव यांच्या या विवेचनाचे प्रत्यंतर नामदेव ढसाळ, ज.वि.पवार यांच्या कवितेतून येते. ढसाळांच्या सर्वच काव्यसंग्रहात आंबेडकरांची कविता आढळते. एवढेच नाही तर तुझे बोट धरुन चाललो आहे मी, (२००७) हा संग्रह

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

म्हणजे आंबेडकरांवरील कवितांचा संग्रह आहे. या सत्तेत जीव रमत नाही या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत त्यांनी व्यक्त केलेले विचार महत्वाचे आहे. या संग्रहात ते म्हणतात-

**तुझ्या चारित्र्याचा मिथक अर्थ वाचून**
**स्वत:लाही आरपार बदलतो आहे**
**किती वाऱ्यावावधानातून विजापावासातून महापुरातून**
**संभाळून आणलेस तू येथपर्यंत**
**इथून एकट्याने पुढे जायचं**
**तू सोबत असतोस तेव्हा कशाचीच भीती वाटत नाही**
**- या सत्तेत जीव रमत नाही ? पृ.११६**

अशाच प्रकारची कृतज्ञता प्रत्येक दलित कवी व्यक्त करतो. आंबेडकरांनाच आपले सर्वस्व मानतो. आपले प्रेरणास्थान मानतो. दुसऱ्या पिढीतील दलित कवी अरुण काळे म्हणतात.

**"सूर्यानेही स्वत:ला**
**भीमराव म्हणवून घ्यावं**
**एवढं तुझं मोठेपण..."**
**- रॉकगार्डन पृ.४५**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा केंद्रबिंदू मानून दलित साहित्याची निर्मिती होत आहे आणि झाली सुध्दा आहे. त्यामुळे कवितेच्यादृष्टीने विचार करावयाचा झाल्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे निश्चितपणे एक मिथ बनत जात आहेत.

RESEARCH JOURNEY

**उपसंहार :**

दलित कवितेची वरील स्वरुप वैशिष्ट्ये लक्षात घेता असे म्हणता येते की, दलित कविता ही स्वतंत्र व्यक्तीमत्त्वाची आणि लक्षणीय आहे. नकार, वेदना, विद्रोह या त्रिसुत्रींचा अंगीकार करुन या कवितेचा प्रवास होत आहे. पदापर्णातच आपल्या अस्तित्वाची दखल घ्यायला लावणाऱ्या या कवितेने डॉ.आंबेडकर हेच आपले मुख्य प्रेरणास्थान मानुन स्वतंत्र वाटचाल केली आणि आपली स्वतंत्र ओळखही निर्माण केली. तोचतोचपणा, आक्रस्ताळेपणा, एकसुरीपणा, साचेबंदपणा, नकारात्मकता असे आरोपही तिच्यावर केले गेले. पण काळाबरोबर प्रवाहीत होऊन आणि काही वैशिष्ट्येपुर्ण प्रयोगांनी तिने आपले अस्तित्व आणि महत्व सिध्द केले. दलित कविता जेवढी सशक्त आणि वैशिष्ट्येपुर्ण आहे तेवढे इतर दलित साहित्यप्रकार नाही. त्यामुळे कविता हीच या साहित्याची खरी ओळख ठरली. मराठी कवितेला समृध्द करुन या कवितेने तिच्या सर्वांगीण कक्षा रुंदावणाऱ्या, तिचे अनुभवविश्व व्यापक केले. दलित कवितेने मराठी कवितेला दिलेले हे योगदान महत्वपुर्ण आहे. साठोत्तरी साहित्यातील महत्वाचा वाङ्मयप्रवाह असलेल्या दलित साहित्यात कविता हाच वाङमयप्रकार सर्वार्थाने प्रयोगशील ठरला. दुसऱ्या पिढीच्या लेखनाने ही याचे प्रत्यंतर दिले. नंतरच्या काळात जागतिकीकरण आणि तत्सम परिवर्तनाचा परिणाम नव्या दलित कवितेवर आढळून येतो. परंतु अरुण काळे, प्रज्ञा लोखंडे, राम दोतोंडे, रविचंद्र हडसनकर, प्रकाश कृष्णाजी कांबळे असे काही अपवाद वगळता ही कविता फारसा प्रभाव निर्माण करु शकली नाही. साठोत्तरी काळात विशेष बहराला आलेली दलित कविता नव्वोदत्तरी

कालखंडात काहीशी क्षीण वाटू लागते. अर्थात त्यामागे विविधांगी परिवर्तने हे कारण आहेच. परंतु त्यामुळे दलित कविता या संकल्पनेखाली प्रामुख्याने साठोत्तरी दलित कवितेचाच विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

**संदर्भग्रंथ -**

१. निळी पहाट- रा.ग.जाधव

२. दलित कविता - म.सु.पाटील.

३. दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह - डॉ.भालचंद्र फडके